N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** कळंबोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0283 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/11/2023 04:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 24/11/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/11/2023
**Time From (वेळेपासून):** 15:23 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/11/2023 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/11/2023 04:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रादेशिक,परीवहन अधिकारी, कार्यालय,कळंबोली येथील कार्यालयाचे लगत, गाळा क्र 4 मध्ये ,कळंबोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamS

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. शफिक सुलेमान शेख
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रूम नं 002,हनुमान नगर, गास,रिध्दी सिध्दी अपार्टमेंट,नालासोपारा, जि पालघर,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रूम नं 002,हनुमान नगर, गास,रिध्दी सिध्दी अपार्टमेंट,नालासोपारा, जि पालघर,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7755997917

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भुषण यशवंत कदम | | | 1. चिंद्रण, पोदेवीचा पाडा,पनवेल, नवीन पनवेल,नवी मुंबई,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एकुण1500 रुपये (पाचशे रुपये दराच्या तीन नोटा ) | 1,500.00 |



Scanned with CamS

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, श्री. शफिक सुलेमान शेख, वय 31 वर्षे, राहणार - रूम नं 002, रिध्दी सिध्दी अपार्टमेंट, हनुमान नगर, गास, नालासोपारा, जि. पालघर 401203, मोबाईल नंबर 7755997917 असा आहे.

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद पत्त्यावर जन्मापासून माझे परिवारासह राहणेस आहे. तसेच सध्या मी कामामिनित्य सेक्टर 20, नेरळ, नवी मुंबई येथे मित्राकडे राहण्यास आहे. मला झोमॅटो या फुड डिलीव्हरी कंपनीमध्ये डिलेव्हरीचे काम मिळणार असुन त्याकरीता दुचाकी वाहन परवाना आवश्यक असल्याचे मला समजले. मला स्वतःचे दुचाकी वाहन चालविण्याचा परवाना (लर्नींग लायसन्स) काढावयाचे असल्याने मी दि. 20/11/2023 रोजी, कळंबोली आर.टी.ओ.कार्यालय, येथे गेलो असता सदर ठिकाणी कार्यालयाचे लगत असलेल्या वेगवेगळ्या गाळ्यामध्ये आर.टी.ओ.एजंट बसलेले दिसले.

मला लायसन्स काढण्याच्या प्रक्रियेबाबत पूर्ण माहिती नसल्याने मी त्यापैकी 4 नंबरच्या स्टॉलमध्ये जावुन तेथील उपस्थित एजंटला मला टु व्हीलरचे लर्नींग लायसन्स काढावयाचे असल्याचे सांगितले. त्यावेळी नमुद एजंट यांनी मला टु व्हीलरचे लर्नींग लायसन्स काढण्यासाठी पॅन कार्ड व आधार कार्ड लागणार असल्याचे सांगुन, लर्नींग लायसन्स काढणेकरीता 2,500/- रू. दयावे लागतील असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना एवढे पैसे तर माझेकडे नाहीत. असे बोलुन, टु व्हीलरचे लर्नींग लायसन्स काढण्यासाठी शासकीय फी तर फक्त 200/- रू. आहे. मग तुम्ही माझेकडे एवढे पैसे का मागता ? असे विचारले असता, नमुद एजंट यांनी मला, 'जर तुला टु व्हीलरचे लर्नींग लायसन्स काढावयाचे असेल तर तुला मला 2,500/- रू. दयावेच लागतील. नाहीतर मी तुझे लायसन्सचे काम करणार नाही.' असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना 2,500/- रू. खुपच जास्त होतात, यात काहीतरी कमी करा असे सांगितले असता, त्यांनी मला, 'आमचा रेट फिक्स आहे त्यात काहीच कमी जास्त होणार नाही. तुला लायसन्स काढायचे असेल तर तुला तेवढे पैसे मला दयावेच लागतील' असे सांगितले. सदरवेळी मी नमुद खाजगी एजंट यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव भुषण कदम असल्याचे मला सांगितले.

अशा प्रकारे टु व्हीलरचे लर्नींग लायसन्स काढण्यासाठी शासकीय फी तर फक्त 200/- रू. असतांना आर.टी.ओ. एजंट श्री.कदम हे त्यांचे लगत असलेल्या आरटीओ कार्यालयातील संबधीत अधिकारी यांचा प्रभावी ओळख असल्याचे भासवून माझे दुचाकीचे लर्नींग लायसन्स काढुन देण्यासाठी माझेकडे शासकीय फी 200 रू व्यतिरिक्त अधिकचे 2300 रू लाचेचे असे एकूण 2,500/- रू.ची मागणी करीत असल्याने व मला नमुद आर.टी.ओ.एजंट श्री. भुषण कदम यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याचे त्यांचे विरूध्द कारवाई होण्याकरीता दिनांक 21/11/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली आहे.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोनि/हणमंत क्षिरसागर यांनी दिनांक 24/11/2023 रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून, पंच साक्षीदार यांचे समक्ष आर.टी.ओ.एजंट श्री. भुषण कदम यांचे विरूध्द प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली कार्यालयाचे लगत असलेल्या गाळा नंबर 4 मध्ये पडताळणी करावाई केली असता, आंर.टी.ओ.एजंट कदम यांनी, दुचाकी लर्नींग लायसन्स करीता शासकीय फी 200/- रू. व पक्के लायसन्स करीता शासकिय शुल्क 900/- रू असे एकत्रीत 1100/- षुल्क असतांना, माझे लर्नींग व पक्के लायसन्स काढुन देणेकरीता 2,500/- रू.लाचेची मागणी करून लायसन्स करीता उर्वरीत कागदपत्र व लाचेची रक्कम घेवुन तात्काळ येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत झालेले आहे.

वरील प्रमाणे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत, आर.टी.ओ.एजंट कदम यांनी, माझे दुचाकी लर्नींग लायसन्स काढून देणेकरीता लर्नींग लायसन्सची शासकीय फी 200/- रू. व पक्के लायसन्स करीता शासकिय शुल्क 900/- रू असे एकत्रीत 1100/- शुल्क असतांना, माझेकडे 2,500/- रू.लाचेची मागणी करून लायसन्स करीता उर्वरीत कागदपत्र व लाचेची रक्कम घेवुन तात्काळ येण्यास सांगितले असल्याचे निशपन्न झाल्याने, तसेच



Scanned with CamS

सदरची रक्कम त्यांना अल्पवधीतच द्यावयाची असल्याने पोनि/क्षिरसागर यांनी सुरु असलेल्या कारवाईमध्ये पडताळणी पंचनामा, सापळापूर्व पंचनामा व सापळा पंचनामा स्वतंत्रपणे करणे करीता पुरेसा अवधी नसल्याने, सदर कारवाईमध्ये पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा एकत्रित करण्याचा निर्णय घेतला. तसेच लाचेची रक्कम देण्यास विलंब झाल्यास आर.टी.ओ. एजंट श्री. भुषण कदम यास संशय येवू नये म्हणून लागलीच, कळंबोली बस स्थानक येथे शासकीय वाहनातच सापळापुर्व पंचनामा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. व त्याचवेळी पोनि/क्षिरसागर यांनी मला आर.टी.ओ. एजंट श्री. भुषण कदम यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेची रक्कम 2,500 /-रु. आहेत काय? याबाबत विचारले असता, माझेकडे माझे स्वबचतीतील 2500/-रु असल्याचे पोनि/क्षिरसागर यांना सांगितले.

त्यानंतर माझेकडील रोख रक्कम 2,500/-रू. मी लाचेच्या सापळा केसकामी हजर केले असता, नोटांचे नंबर नोंदवून त्यास अँन्थ्रासीन पावडर लावून, त्याचे प्रात्यक्षिक अल्ट्राव्हाइलेट दिव्याच्या प्रकाशात करुन देवून सापळापुर्व कारवाई करण्यात आली व लाचेची रक्कम आर.टी.ओ.एजंट श्री. भुशण कदम यांनी स्विकारल्यानंतर, मला माझा उजवा हात दोन वेळा डोक्यावरून फिरवुन पुर्वनियोजीत ईषारा करणेबाबतच्या सुचना पोनि/क्षिरसागर यांनी सुचना दिल्या.

त्यानंतर पोनि/क्षिरसागर यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली येथे सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने पोनि/क्षिरसागर यांनी मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा/सोनवणे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून, तो माझे शर्टच्या आतील बनियनमध्ये ठेवून दिल्यानंतर, मी व पंच नंबर 1 कांबळे असे कळंबोली बस स्थानक येथुन भाडोत्री रिक्षाने निघुन प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली कार्यालयाचे लगत असलेल्या आरटीओ खाजगी एंजट भुषण कदम यांचे गाळा क्र 04 मध्ये आलो. तसेच पोनि/क्षिरसागर, पंच क 02 व सापळा पथकातील सर्व कर्मचारी असे शासकिय वाहनाने आमचे रिक्षाचे मागोमाग येवुन प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली कार्यालयाचे समोरील रोडवर कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहिले.

त्यानंतर मी व पंच नंबर 1 श्री. कांबळे असे प्रादेशिक परिवहन कार्यालय, कळंबोली कार्यालयाचे लगत असलेल्या गाळा 4 मध्ये गेलो. सदर ठिकाणी खाजगी एजंट भुषण कदम उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी मला कागदपत्र आणली का ? याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना आणली असल्याचे सांगितले. त्यानंतर भुषण कदम यांनी माझे लर्निग लायसन्सचे ऑनलाईन अप्लीकेशन केले. ऑनलाईन अप्लीकेशन झाल्यानंतर भुषण कदम यांनी मला लर्निंग लायसन्सचे आता सध्या 1,500/- व महिन्यानंतर 1000रु देण्यास सांगितले. त्यावेळी मी माझे नेसुन पॅन्टचे पाठीमागील डाव्या खिशातून माझे डाव्या हाताने 2,500 काढून, त्यातील 1,500/- आर.टी.ओ.एजंट कदम यांचे समोर धरली असता, त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारली व डाव्या हाताने नेसूस पॅन्टच्या मागील डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी उर्वरीत 1,000/- पुन्हा माझे नेसुस पॅन्टच्या पाठीमागील डाव्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर भुषण कदम यांनी मला त्यांचे टेबलवरील लॅपटॉपवर लर्निग लायसन्स करीता ऑनलाईन परीक्षा देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी भुषण कदम यांचे टेबलवरील लॅपटॉवर लर्निग लायसन्स करीता ऑनलाईन परीक्षा दिली. नमुद परीक्षा झाल्यानंतर भुषण कदम यांनी मला माझे लर्निग लायसन्सची छायांकित प्रत काढुन दिली. त्यानंतर मी नमुद गाळयाचे बाहेर येवुन आरटीओ एंजट भुषण कदम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास दिसेल अशा रितीने माझा उजवा हात दोन वेळा माझे डोक्यावरून फिरवुन पुर्व नियोजीत इशारा केला मी केलेला इशारा पाहुन, सापळा पथकातील पोनि/क्षिरसागर, पोहवा/सोनवण, मपोहवा/पाटील, पोशि/भुजबळ व पंच नंबर 2 श्री. बारसे असे माझे जवळ आले व लाचेची रक्कम स्विकारणा-या आर.टी.ओ.एजंट बाबत मला विचारले असता मी, आर.टी.ओ.एजंट भुषण कदम यांचेकडे इशारा करून हेच ते आर.टी.ओ.एजंट कदम असुन, त्यांनीच आता माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली असल्याचे मी पोनि/क्षिरसागर यांना सांगितले.

त्यानंतर पोनि/क्षिरसागर यांनी भुषण कदम यांना स्वतःची तसेच दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख सांगुन, माझेकडुन स्विकारलेली लाचेची रक्कम कुठे ठेवली? याबाबत विचारले असता, कदम यांनी माझे कडुन स्विकारलेली लाचेची रक्कम नेसुस पॅन्टचे मागील डावे खिशात ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि/क्षिरसागर यांनी पंच नंबर 2 श्री. बारसे यांना आर.टी.ओ.एजंट भुषण कदम यांचे नेसुन पॅन्टचे मागील डावे खिशात असलेली लाचेची रक्कम काढून, तपासण्यास सांगितली असता, त्याप्रमाणे पच क्र 02 बारसे यांनी भुशण कदम यांचे नेसुन पॅन्टच्या डाव्या खिशातील तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेली लाचेची रक्कम बाहेर काढुन ती पाहिली असता, त्यामध्ये 500/- दराच्या 03 नोटा असे एकुण 1500/- मिळुन आले असुन नमुद नोटांचे नबंर्स सापळापुर्व कारवाईत नमुद केलेल्या नंबर्सशी तंतोतंत जुळुन आलेले आहेत. त्याचवेळी पोशि/भुजबळ यांनी आर.टी.ओ.एजंट कदम यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट धरून ठेवले व लाचेची रक्कम स्विकारणा-या आर.टी.ओ.एजंट कदम यांना पुढील कारवाईकामी

Scanned with CamS

ताब्यात घेण्यात आले. ती वेळ 15.23 वाजताची होती. त्यानंतर पोहवा/सोनवणे यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 15.24 वाजताची होती. त्यावेळी पोनि/क्षिरसागर यांनी आर.टी.ओ. एजंट कदम यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. भुषण यशवंत कदम वय-29 वर्षे, व्यवसाय आरटीओ एजंट (खाजगी इसम) राहणार-चिंद्रण, पोष्ट-देवीचा पाडा, ता. पनवेल, जि. रायगड असे असल्याचे सांगितले.

तरी माझे दिनांक 21/11/2023 रोजीच्या तक्रारीनुसार, दिनांक 24/11/2023 रोजी प्रादेशिक परीवहन अधिकारी, कार्यालय कळंबोली या कार्यालयाचे लगत असलेल्या गाळा क्र 4 मध्ये करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईमध्ये श्री. भुषण यशवंत कदम वय-29 वर्षे, व्यवसाय आरटीओ एजंट (खाजगी इसम) राहणार-चिंद्रण, पो.देवीचा पाडा, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांचे लगत असलेल्या आरटीओ कार्यालयातील संबधीत अधिकारी यांचा प्रभावी ओळख असल्याचे भासवून माझे दुचाकी लर्निंग लायसन्स करीता शासकीय फी 200/- रू. व पक्के लायसन्स करीता शासकिय शुल्क 900/- रू असे एकत्रीत 1100/- शुल्क असतांना, माझे लर्निंग व पक्के लायसन्स काढुन देणेकरीता 2,500/- रू.लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन 1,500/- रू. स्विकारले असतांना त्यांना, प्रादेशिक परीवहन कार्यालय, कळंबोली कार्यालय लगत असलेल्या गाळा क्र 4 या ठिकाणी दिनांक 24/11/2023 रोजी 15.23 वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. माझी त्यांचे विरोधात कायदेशिर फिर्याद असून कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलीखीत करण्यात आली असुन, ती मला वाचुन हिंदीतुन समजावुन सांगितली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DILIP THAKNATH GUJAR(I (Inspector)) / ddgm6801 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned with CamS

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DILIP THAKNATH GU

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** ddgm6801

पोलीस ठाणे अमलदार
कळंबोली पोलीस स्टेशन
नवी मुंबई

Scanned with CamS

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

Scanned with CamS